30 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# कॉपीबहाद्दरांच्या फंड्याने प्रशासन थक्क

## यंदा १५०० विद्यार्थी पकडले : गतवर्षाच्या तुलनेत दुपटीने झाली वाढ

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपीबहाद्दरांनी केलेले कारनामे शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाला थक्क करणारे ठरले आहेत. यंदा परीक्षेवेळी उत्तरे पॅडवर लिहिण्याबरोबरच कमरेवरील बेल्टच्या आतील बाजूस, ओळखपत्राच्या मागील बाजूवर, पेनाच्या टोपणातून कॉपी नेण्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळेच यंदाच्या परीक्षांत कॉपीबहाद्दरांचा आकडा १५०० इतका राहिला. परीक्षा विभागाच्या भरारी पथकाने केलेल्या कामगिरीने कॉपीबहाद्दरांचे



प्रताप यंदा अधिक प्रमाणात उघडे पडले आहेत.

यावर्षी कॉपीबहाद्दरांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत दुपटीने वाढल्याचे निदर्शनास आले

| वर्ष | कॉपी प्रकरणे | विद्यार्थी | विद्यार्थिनी | निर्दोष |
|---|---|---|---|---|
| २०१६ | १५०० | १०७५ | ४२५ | ३० |
| २०१५ | ८०७ | ३९५ | १९८ | २१ |
| २०१४ | १३७० | ९३० | ४४० | ५७ |
| २०१३ | ७२७ | ४४९ | २७८ | ७५ |
| २०१२ | ५०१ | ३५० | १५१ | ६४ |
| २०११ | ७१० | ४८० | २३० | ८४ |

आहे. परीक्षा विभाग परीक्षेवेळी विद्यार्थ्यांकडून कॉपीसारखे प्रकार घडू नयेत, यासाठी भरारी पथकाच्या माध्यमातून नजर ठेवतो. तरीही उत्तीर्ण होण्यासाठी काय वाटेल ते, या प्रवृत्तीतून विद्यार्थी कॉपी करण्यापासून परावृत्त होत नाहीत. विद्यार्थ्यांसह विद्यार्थिनीसुद्धा कॉपी करण्यात आता मागे राहिलेल्या नाहीत. यंदा विद्यार्थिनींचा कॉपी करण्याचा आकडा ४२५ इतका होता. विशेष म्हणजे विद्यार्थिनी ओढणीवर उत्तरे लिहून कॉपी करत असल्याचे आढळले आहे. त्याचबरोबर हातावर, पायाच्या तळव्यावर लिहिण्याचे प्रमाण त्यांच्यात अधिक आहे. परीक्षक आपल्याला कॉपी करताना पकडू शकत नाही, या मानसिकतेतून विद्यार्थिनींचा कॉपी करण्याचा आकडा वाढत असल्याचे सहायक कुलसचिव डी. डी. अडगळे यांनी सांगितले.

कॉपी करताना पकडल्यानंतर विद्यार्थ्यांची परीक्षा प्रमाद समितीसमोर चौकशी होऊन कारवाई होते. यंदा १५०० पैकी केवळ तीस विद्यार्थी कॉपी प्रकरणात निर्दोष सुटले आहेत उर्वरितांना समितीच्या शिक्षेल सामोरे जावे लागले. परीक्षेवेळ काही विद्यार्थ्यांना कॉपी न करताह कॉपी केल्याच्या आरोपास सामो जावे लागले. त्यांची चौकशी करू ते खरोखरच कॉपीपासून अलि असल्याची खात्री करून समिती त्यांना शिक्षा होणार नाही, याच दक्षता घेतली. मात्र जे परीक्षकां कॉपी करताना रंगेहाथ सापड आहेत, त्यांच्यावर एक-दोन परीक्षां बंदी घालण्याचा बडगा उगारल आहे. कॉपी करण्यापेक्षा विद्यार्थ्यां अभ्यास करून उत्तीर्ण व्हावे, ही परीक्षा विभागाची अपेक्षा आहे.

30 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकसत्ता

# शासकीय योजनांच्या मूल्यमापनासाठी शिवाजी विद्यापीठाची नेमणूक

प्रतिनिधी, कोल्हापूर

**राज्य शासनाच्या** नियोजन विभागाच्या २२ जुलैच्या शासन निर्णयानुसार विविध शासकीय योजनांच्या मूल्यमापनासाठी नामांकित बाह्यास्थ संस्थांची नामिका सूची तयार करण्यात आली असून त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत नियोजन विभागाच्या अधिपत्याखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत सीमित प्रमाणात योजनेचे मूल्यमापन करण्यात येते. मूल्यमापनाची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने तसेच नमुना पाहणी व सांख्यिकी विषयाबाबत शासनाच्या विभागांना व कार्यालयांना सल्ला देऊ शकेल अशा सक्षम व नामांकित संस्थांची नामिका सूची तयार करण्यात आली आहे. या सूचीमध्ये शासन सहाय्यित संस्था- १० पेक्षा कमी जिल्ह्यात किंवा एका महसुली विभागासाठी शिवाजी विद्यापीठाची नियुक्ती करण्यात आली आहे. या यादीमध्ये शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या केवळ दोन अकृषी विद्यापीठांचा समावेश आहे. या संदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे काम अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे यांनी केले. यामध्ये अर्थशास्त्र विभागातील डॉ. एम.एस. देशमुख, संख्याशास्त्र, पर्यावरणशास्त्र आणि अभियांत्रिकी विभागामधील डॉ. डी.एन. काशीद, संतोष सुतार, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. गिरीश कुलकर्णी यांचा तज्ज्ञ म्हणून समावेश करण्यात आला आहे.

### पेमेंट गेट-वे, अॅन्ड्रॉइड अप्लिकेशन

**शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी दोन महत्त्वपूर्ण ऑनलाइन उपक्रम कार्यान्वित केले आहेत. सध्या दीक्षान्त प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुरू असल्याने ती पूर्णतः पेमेंट गेट-वेच्या माध्यमातून करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सध्या बहुतांश विद्यार्थी मोबाईल वापरत असल्याची बाब लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या 'अन्ड्रॉइड ॲप्लिकेशन' निर्मिती केली आहे, असे डॉ. मिलिंद जोशी यांनी सांगितले.**